नियमित दिवाणी दावा क्र. १६/२०१२ मधील निशाणी १७२ वर आदेश
CNR No.MHAK070001062012
(दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२२)

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ८ यांनी त्यांचे विरूध्द निशानी १ वर पुरावा नाही बाबत झालेले आदेश बाजूला सारून / अपास्त करणेकरीता व त्यांना वादी साक्षीदार (मुखत्यार) व प्रतिवादी क्र. १ व त्यांचे साक्षीदारांची उलट तपासणी घेण्याची परवानगी मिळणेबाबत आणि पुरावा दाखल करण्याची परवानगी मिळणे बाबत दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. ८ यांनी कथन केले की, वादीने प्रतिवादीविरूध्द सरसनिरस वाटणी होणे बाबत इत्यादी करीता दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये त्यांनी हजर होवून लेखी जबाब दाखल केला आहे. जबाब दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र. ८ यांना त्यांचे वकिलांनी सांगितले होते की, वकिल साहेब जेव्हा बोलावतील तेव्हा न्यायालयात हजर राहावे. प्रतिवादी क्र. ८ यांनी त्यांचे वकिलांवर विश्वास ठेवला परंतु प्रतिवादी क्र. ८ यांना त्यांचे वकिलांनी बोलाविले नाही व वरील प्रकरणाबाबत कोणतीही माहीती कळविली नाही. दिनांक २८.०८.२०२१ रोजी प्रतिवादी क्र. १ राजकुमार नारायण शर्मा व प्रतिवादी क्र. ८ यांची अचानक आठवडी बाजार बाळापूर येथे भेट झाली तेव्हा प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ८ यांना वरील दावा विद्यमान न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याबाबत सांगितले. त्यावरून प्रतिवादी क्रमांक ८ हे दिनांक ०२.०९.२०२१ रोजी प्रकरणात हजर झाले व दाव्यामध्ये प्रतिवादी क्रमांक ८ चे वतीने कामकाज पाहणे करीता वकिलांची नेमणूक केली. प्रतिवादी हे न्यायालयात हजर झाल्यानंतर दाव्याची व दाव्यामधील इतर दस्तऐवजांच्या प्रती निर्गमित केल्या तेव्हा सर्वप्रथम प्रतिवादी क्र. ८ ला माहीत पडले की अकोला येथील माननिय दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अकोला यांचे न्यायालयात दावा न्यायप्रविष्ठ असतांना आणि तेथील वकिलांनी प्रतिवादी क्र. ८ यांना दाव्याचे झालेल्या कारवाई बाबत तसेच वादी तर्फे वादीचे मुखत्यार यांनी पुरावा दिला तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी स्वतःची साक्ष व साक्षीदारांची साक्ष तपासली याबाबत कुठलीही माहीती दिली नाही व ते सदर पुरावे वेळी हजर सुद्धा नव्हते त्यामुळे न्यायालयाने त्याबाबतचे निशानी १ वर आदेश पारीत केले

आहेत. प्रतिवादी क्र. ८ हे वादीचे साक्षीदार व प्रतिवादी व त्यांचे साक्षीदार यांचा उलट तपास घेण्यास तयार आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ८ हे स्वतःचा पुरावा व साक्षीदार तपासण्यास तयार आहेत.

३. वाद हा स्थावर मिळकतीचा असुन प्रतिवादी क्र. ८ यांनी वाद मिळकत ज्याचा शेत गट नंबर १४१ मधील १ हे १६ आर शेत प्रतिवादी क्र. १ यांचेकडून नोंदणीकृत खरेदी खताने विकत घेतले आहे. सबब वादाचे स्वरूप पाहता प्रतिवादी क्र. ८ यांचा अर्ज मागणी प्रमाणे मंजुर करावा. प्रतिवादी क्र. ८ ला उलट तपास घेण्याची व पुरावा देण्याची संधी न दिल्यास प्रतिवादी क्र. ८ यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल व प्रतिवादी क्र. ८ हे न्यायापासुन वंचीत राहतील. प्रतिवादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्र. ८ हे न्यायालयाचे आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यास तयार आहेत. करीता अर्ज.

४. वादीने निशाणी १७३ वर म्हणणे दाखल केले. त्याने सदर अर्जातील कथने नाकारली. त्यांचे म्हणणे असे की, प्रतिवादी क्र. ८ हा इतर प्रतिवादींना मिळून आहे. प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादीने प्रकरण लांबवण्याच्या कुहेतुने बऱ्याच अंतिम समयी वादीला त्रास देण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीची कथने पाहता त्याचा प्रस्तुत प्रकरण चालविण्याकरीता किती दुर्लक्षित व्यवहार होता ते दिसून येते. त्यामुळे स्वतःच्या निष्काळजीपणाची जबाबदारी प्रतिवादी इतरांवर टाकू शकत नाही. दोन्ही पक्षांचा पुरावा संपला असून न्यायालयाने प्रतिवादीला पुरेशी संधी दिली होती व त्याअनुषंगाने निशाणी १ वर आदेशही पारीत केले होते. परंतु प्रतिवादी क्र. ८ सदर संधी घेण्यास निष्फळ ठरला. प्रस्तुत दावा १८ वर्षे जुना दावा असून दोन्ही पक्षांनी लेखी युक्तीवाद दाखल केला होता आणि दावा न्यायनिर्णयाला लागला असतांना प्रतिवादीने अर्ज केला आहे. अर्ज मंजुर करण्यास कोणतेही पर्याप्त कारण नाही. अर्ज कायदेशिर नसून तो रुपये ५०००/- खर्चासह खारीज करण्यात यावा.

५. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले. दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा मा. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, अकोला यांच्या न्यायालयात सुरुवातीला दाखल झाला होता. त्यानंतर सदर दावा या न्यायालयात वर्ग करण्यात आला होता. सदर दावा

वर्ग झाल्यावर प्रस्तुत प्रतिवादी क्र. ८ ला सुध्दा नोटीस काढण्यात आली होती. त्यानंतर प्रतिवादी क्र. ८ हा हजर झाला होता व त्याने वकिलांची नियुक्ती केली होती. सदर बाब माहे जुलै २०१२ मधील आहे. अभिलेख पाहिला असता त्यानंतर प्रस्तुत प्रतिवादी क्र. ८ या दाव्यात कधीही हजर झाला नाही.

६. प्रतिवादी क्र. ८ ने प्रस्तुत अर्जाद्वारे कथन केले आहे की, त्याच्या वकिलांनी त्याला ते जेव्हा बोलावतील तेव्हा न्यायालयात हजर रहावे असे सांगितले होते. त्याचप्रमाणे त्यांनी वकिलांवर विश्वास ठेवला. त्यानंतर त्यांना वकिलांनी बोलाविले नाही व माहिती दिली नाही. दिनांक २८.०८.२०२१ रोजी त्यांना प्रतिवादी क्र. १ कडून कळाले की, प्रस्तुत दावा न्यायप्रविष्ठ आहे. अशा प्रकारे प्रतिवादी क्र. ८ यांनी प्रकरणात कोणतीही पावले न उचलण्याबाबत त्याचे त्यावेळेसचे वकिल यांचे कारण दिले आहे. प्रस्तुत दावा न्यायनिर्णयाच्या घडीला आला असतांना प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ८ ने दाखल केला आहे. वादीचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी क्र. ८ हा प्रतिवादी क्र. १ शी मिळून आहे. असे जरी असले तरी प्रतिवादी क्र. ८ ची कैफियत पाहता त्याच्या म्हणण्याप्रमाणे तो प्रामाणिक खरेदीदार आहे. सबब, दाव्यातील तथ्य व परिस्थिती पाहता न्यायाच्या हितास्तव आणि दोन्ही पक्षातील संपुर्ण वादाचे एकदाच निराकरण करण्यासाठी प्रतिवादी क्र. ८ ला संधी देणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिवादी क्र. ८ विरुध्द अन्याय होवू शकतो. असे जरी असले तरी प्रतिवादी क्र. ८ ने केलेला विलंब पाहता त्याच्यावर मोठा खर्च बसवण्याची आवश्यकता आहे. सबब, प्रतिवादी क्र. ८ चा अर्ज खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. ८ ने वादीला रक्कम रुपये ५०००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. सदर खर्च प्रतिवादी क्र. ८ ने या आदेशापासून १५ दिवसांच्या आत अदा करावयाचा आहे.

३. सदर खर्च वरीलप्रमाणे अदा न केल्यास प्रस्तुत आदेश रद्द होईल.

४. खर्च दिल्याच्यानंतर प्रतिवादी क्र. ८ ने वादीच्या साक्षीदारांची उलटतपासणी घेवून त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व त्याच्या साक्षीदारांची उलटतपासणी घेण्याची आणि स्वतःचा पुरावा दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

५. अर्जाचा खर्च अर्जदारावर ठेवण्यात येत आहे.

CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI

Digitally signed by CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI
Date: 2022.02.01 17:34:20 +0530

बाळापूर. (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक ०१.०२.२०२२ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बाळापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date of Order | : | 01/02/2022. |
| Signed by Presiding Officer on | : | 01/02/2022. |
| Uploaded on | : | 01/02/2022. |

---------------------------------------------------------------------------------------------